आपण हा लेख www.maanavta.com या अध्यात्मिक वेबसाईट वर वाचत आहात.

संपादकीय

वास्तवता आणि भौतिकता - एक समन्वय

लेखक – श्री. राम कुमार 'सेवक' जी मुख्य संपादक – www.maanavta.com

चंद्र सुर्य नभांगणात प्रकाशमान आहेत. भुमातेच्या उदरातुन पिकांची निरंतर निर्मिती होत आहे. पाण्याने आम्हा सर्वांची तहान शमत आहे. मातींपासुन विटांची निर्मिती आणि विटांपासुन घरांची निर्मिती होत आहे. आणि त्याच घरांपासुन आमचे ''ऊन–वारा–पाऊस'' याच्यापासुन संरक्षण होत आहे, या सत्यास भले कोण नाकारू शकतो?

सुर्याच्या तापापासुन आम्ही छत्रीच्या साहयाने स्वत:ला संरक्षित (बचाव) करतो. तर उकाडयाच्या त्रासापासुन वाचण्यासाठी पंखा, कुलर इत्यादी साधनांची व्यवस्था करतो. विटांपासुन निर्मित घरांमध्ये आम्ही राहतो आणि त्याच घरांमधील विविध वस्तु (पदार्थ) आम्हास समाधान प्रदान करतात. छत्री, एअरकंडीशन, घर अशा विविध वस्तु देखील पदार्थच आहेत.

वरील दोन्ही परिच्छेद हेच स्पष्ट करित आहोत की, भौतिकतेत (पदार्थ) वास्तवता तसेच वास्तवतेत भौतिकता सामावलेली आहे. आम्ही वास्तवतेचाही स्वीकार करित आहोत त्याबरोबर भौतिकतेचा सुध्दा. जगात राहणाऱ्या प्रत्येक मानव–प्राण्याला याचा स्वीकार करावाच लागतो.

प्रश्न हा आहे की, भौतिकतेमुळे मानवी मनात अहंकार निर्माण होतो, जो व्हावयास नको आहे.

गत वर्षी मला विवाहानिमित्त एका ठिकाणी जाण्याचा योग आला, त्या ठिकाणी बघायला मिळाले की, तेथील प्रत्येक स्त्रीने आपल्या नाकात नथ घातली आहे. त्यातील विशेषता ही होती की, काही स्त्रियांची नथ ही इतरांपेक्षा आकाराने मोठी होती. उत्सुकतेने मी यजमानास याचे कारण विचारले तर त्यांनी सांगितले की, या प्रातांत काही जमातीमध्ये ही संस्कृती (परंपरा) आहे की, स्त्रियांच्या नथनीचा आकार हा त्यांच्या संसारीक परिस्थितीनुसार असतो. जितकी गडगंज संपत्ती तितका नथनीचा आकार मोठा. हे ऐकल्यावर आश्चर्यचकीत होण्याशिवाय पर्यायच नव्हता. ही तर फक्त एक घटना आहे, अन्यथा मानव आपला बडेजावपना मिरवण्यासाठी काय काय क्लुप्त्या नाही योजत.

पुर्वीच्या काळात मुलांचे लग्न करणे इतके कठीण नव्हते जितके आज घडीला झालेले आहे. यांच्या कारणांच्या मुळाशी गेले तर आम्हाला हेच जाणवत की, हे सर्व होतय. ते फक्त अंहकारामुळे. आनंदाच्या नावावर बडेजावपना आणि श्रीमंतीचे प्रदर्शन मांडले जातय. श्रीमंती आणि बडेजावपना हे काही नसुन अहकारांचेच दुसरे नांव आहे. आणि हाच अंहकार मानवी आत्म्याच्या मुक्ती मार्गातील मोठा अडसर आहे. याच कारणास्तव अनेक ऋषी मुनीवरांनी निर्जन स्थळांचा (वनां) आसरा घेतला जेणेकरून शाश्वत सत्याची अनुभूती करून जन्ममृत्युच्या बंधनातुन मुक्ती मिळु शकेल.

तथापी हा तर शुध्द आणि पवित्र उद्देशासाठी केला गेलेला प्रामाणिक प्रयत्न होता. जरी त्यांच्या कर्मात शुध्द भाव होता तरी ते होतं आपल्या संसारी कर्तव्य–कर्मापासुन पलायनचं.

असा वाटतय डोकेदुखीपुसन वाचण्यासाठी कुणी सज्जनांने आपल्या डोक्याचाच त्याग करावा. कारण पोटामुळेच भुख लागते आणि भुखेसाठी आहाराची आवश्यकता असते. आणि आहार (भोजन) पदार्थाशिवाय मिळु शकत नाही. मानवी शरीरात आम्ही पदार्थापासुन (भौतिकता) स्वत:ला पूर्णपणे वाचवू शकत नाही, पदार्थ आम्हाला आवश्यक आहेत. अन्न वस्त्र, निवाऱ्याची सर्वानाच आवश्यकता आहे, आणि हे तिन्ही पदार्थ आहेत.

माझ्या आशयानुसार इतके भौतिकवादी तर प्रत्येकाला व्हावेच लागले.

अध्यात्म (संतमत) तर हेच दर्शविते की, पदार्थापासुन वाचण्यापेक्षा त्यांच्या (भौतिकतेच्या) अभिनामापासुन वाचणे महत्वाचे आहे.

असे अनेक संत महात्मा आहेत ज्यांनी सांसरिक कर्तव्याचे पालन ही केले आणि कर्ममय जीवनही जगले, ते सांसरिक कर्तव्य कर्मापासुन माघारी फिरले नाहीत. त्यांनी (पदार्थापासुन) भौतिकतेपासुन स्वत: ला दुर ठेवले नाही पण पदार्थाच्या (भौतिकतेच्या) अहंकारापासुन स्वत:स कोसो दुर ठेवले. जसे विदेही राजा जनकाने राजपटाचा कधी अंहकार केला नाही ज्या योगे संसाररूपी कोळशाच्या खाणीतुन ते डाग न लागता बाहेर पडले.

दुसरीकडे बघितल तर भक्त कबीरजी, गृहस्थी संत होते. विणकाम करून उदरनिर्वाह करित होते. ते सुध्दा याच जगात जीवन जगले, दिर्घायुष्य प्राप्त केले तरी ते संसारात लिप्त झाले नाहीत, म्हणूनच त्यांनी दृढ विश्वासाने म्हटले आहे.

ध्रुव–प्रल्हाद–सुदामा ने ओढी, शुकदेव ने निर्मल कीनी
दास कबीर ने ऐसी ओढी, ज्यू की त्यू धर दीनी
चदरिया झीनी रे झीनी.....

म्हणतात की, आयुष्यरूपी शरीरास ते या प्रकारे जगले की, ज्या निर्मळतेने प्राप्त झाले होते त्याच निर्मळरूपात पुन्हा परत केले. या ठिकाणी राजाजनक आणि संत कबीरजी एकाच पातळीवर उभे दिसतात. काही लोक वास्तवतावादी असतात तर काही भौतिकवादी असतात. ''ब्रम्ह सत्य जगत्मिथ्या'' भावार्थ हाच की ब्रम्हाला सत्य मानुन इतर सर्वाला मिथ्या माननारे वास्तवतावादी मानले जातात, आणि रावण–कंस–हिरण्यकश्यपु–हिटलर इत्यादी राज्यकर्ते ज्यांनी जीवनभर पदार्थाचाच मोह केला त्यांना भौतिकवादी म्हणुनच हिणवले गेले. परंतु परमात्मारूपी सत्यापासुन कुणीही अलीप्त राहू शकत नाही. आमचा श्वासोच्छास सुध्दा याच्यातच चालु आहे. सुर्यात उष्मा, चंद्रात शितलता, हीमनगात तथा सागरात पानी निर्माण करणारा हाच आहे. प्रकृतीचे निर्माण याच्यातुनच होते आणि शेवटी विलयही याच्यातच होतो. त्याकरिता इतके वास्तवतावादी तर प्रत्येकाला व्हावेच लागेल, याचा तुम्ही स्वीकार करा अथवा अस्वीकार.

राहिला भौतिकतेचा विषय जसे वर उल्लेख केल्याप्रमाणे पलयानवादी दृष्टीकोनाव्यतिरिक्त कमीत कमी गरजा तर प्रत्येकाला पुर्ण करायच्या असतात यासाठी कमीत कमी भौतिकवादी सुध्दा प्रत्येकाला व्हावेच लागेल.

शेवटी या निष्कर्षावर पोहचतो की,
तू ही निरंकार
तेरा रूप है यह संसार, सबका भला करो करतार
मेरी मांग यही दातार.....

भावार्थ हाच की हे प्रभु पूर्ण संसार तुझीच रचना आहे, कणा–कणात तुझाच वास आहे, ठायी ठायी तुझेच रूप सामावलेले आहे, हे प्रभु तू कृपा कर की सर्वाचे भले होवो.

या पातळीवर एक समन्वयाची अवस्था निर्माण होते जेथे पदार्थाबरोबर (भौतिकता) वास्तवतेचही भान असते आणि या दोन्ही गोष्टी स्विकारणीय ही वाटतात. तसेच 'अहंकार' सुध्दा या पातळीवर नष्ट होतो कारण प्रभु परमात्मा ठायी–ठायी असल्याचा साक्षात्कार होतो.

ही अवस्था प्रत्येकाला प्राप्त व्हावयास हवी जेणेकरून पूर्णत्वाची अनुभूती किंवा प्रत्यय सर्वाना प्राप्त होऊ शकेल.

– राम कुमार 'सेवक'
rksewak@yahoo.co.in

अनुवादक
सुकदेव पाटील
sukdeo_behere@yahoo.co.in